आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता

२८ जुलै २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- येत्या १५ ऑगस्ट निमित्त हर घर तिरंगा अभियानात सहभागी होण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बातमधून देशवासियांना आवाहन
- व्याघ्र संवर्धनासाठी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातल्या गोंड आणि माना जमातींच्या भूमिकेची प्रशंसा
- इस्रायल-हमास संघर्ष संपवण्याच्या दृष्टीनं कतार, इजिप्त आणि अमेरिकी मध्यस्थांशी चर्चा करण्यासाठी इस्रायलचं शिष्टमंडळ रोमला रवाना
- महिलांच्या आशिया चषक टी-ट्वेटी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारत पराभूत, ८ गडी राखून मात करत श्रीलंकेनं पटकावलं विजेतेपद

  **आणि**
- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या १० मीटर एअर पिस्टल प्रकारात कांस्यपदक जिंकत मनू भाकरनं केला भारताच्या पदक कमाईचा प्रारंभ

**<><><><><>**

येत्या १५ ऑगस्ट निमित्त हर घर तिरंगा अभियानात सहभागी होत संकेतस्थळावर तिरंग्यासोबतचा फोटो अपलोड करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हर घर तिरंगा हे अभियान तिरंग्याचा गौरव करणारा उत्सवच झाला असल्याचं ते म्हणाले.

*****होल्ड - प्रधानमंत्री - हर घर तिरंगा ******

स्वातंत्र्य दिनानिमित्त होणाऱ्या भाषणासाठी दरवर्षीप्रमाणेच यंदाही नागरिकांनी MyGov किंवा NaMo App वर सूचना पाठवण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

उद्या जगभरात साजरा होत असलेल्या व्याघ्र दिनानिमित्त मोदी यांनी वाघ आणि मानवी संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी, तसंच वाघांच्या संरक्षणासाठी देशभरात सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती आजच्या मन की बात मधून दिली. याचं उदाहरण म्हणून त्यांनी महाराष्ट्रातल्या ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पाचाही उल्लेख केला. तिथं राहत असलेल्या गोंड आणि माना जमातींच्या नागरिकांनी वाघांच्या हालचाली वाढव्यात म्हणून जंगलावरचं आपलं अवलंबित्व कमी करत, इको - टूरिझमच्या दिशेनं पावलं टाकली आहेत असं ते म्हणाले. लोकसहभागामुळे देशातल्या वाघांची संख्या दरवर्षी वाढत असून, जगभरातल्या एकूण वाघांपैकी ७० टक्के वाघ आपल्या देशात असल्याचा अभिमान वाटतो, असं ते म्हणाले.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी हातमाग आणि इतर स्थानिक उत्पादनं लोकप्रिय करण्यासाठी देशभरातल्या महिलांच्या प्रयत्नांची माहिती दिली. यात त्यांनी महाराष्ट्राची पैठणी तसंच विदर्भातली हँड ब्लॉक प्रिंट या हातमाग उत्पादनांचाही उल्लेख केला.

नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय गणितीय ऑलिम्पियाड स्पर्धेत आजवरची सर्वोत्तम कामगिरी केलेल्या भारतीय विद्यार्थ्यांच्या चमूची कामगिरी त्यांनी देशवासीयांसमोर मांडली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी या स्पर्धेतले पदक विजेते पुण्याचे आदित्य वेंकट गणेश आणि सिद्धार्थ चोप्रा, दिल्लीचा अर्जुन गुप्ता, ग्रेटर नॉयडा इथला कणव तलवार, मुंबईचा ऋषील माथुर आणि गुवाहाटीचा आनंदो भादुरी यांच्याशी संवादही साधला.

सध्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा सुरू आहे, ही स्पर्धा म्हणजे खेळाडूंना जागतिक पातळीवर तिरंगा फडकवण्याची संधी आहे असं म्हणत, या स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय खेळाडूंना देशवासीयांनी पाठिंबा द्यावा असं आवाहनही त्यांनी केलं.

अंमली पदार्थांविरोधातल्या लढ्यातलं मोठं पाऊल टाकत केंद्र सरकारनं 'मानस' हे विशेष केंद्र सुरू केलं आहे. याअंतर्गत समुपदेशन आणि पुनर्वसनाबद्दलच्या माहितीसाठी १-९-३-३ हा टोल फ्री मदत क्रमांकही सुरू केला आहे, अशी माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली.

यंदा खादी ग्रामोद्योगाची उलाढाल पहिल्यांदाच दीड लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली असून, खादी उत्पादनांच्या विक्रीत ४०० टक्क्याची वाढ झाली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

प्रधानमंत्र्यांनी यावेळी आसाममधल्या 'चराईदेऊ मैदाम' या ठिकाणाचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश झाल्याचं सांगून, नागरिकांनी भविष्यात या ठिकाणांना भेट द्यावी, असं आवाहन केलं.

**<><><><><>**

भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या दिल्लीत झालेल्या दोन दिवसीय भाजपाशासित मुख्यमंत्री परिषदेचा आज समारोप झाला. केंद्र सरकार आणि राज्य सरकार एकत्रितपणे लोक कल्याणासाठी जोमानं प्रयत्न करतील तेव्हा विकसित राष्ट्राचं ध्येय आपण निश्चितपणे गाठू असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले.

विकसित भारताच्या संकल्पनेत वारशाच्या विकासासोबतच वारशाच्या निर्मितीला महत्व आहे असं ते म्हणाले. या परिषदेला भाजपाचे अध्यक्ष जे पी

नड्डा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, तसंच १३ मुख्यमंत्री आणि १५ उपमुख्यमंत्री उपस्थित होते.

<><><><><>

इस्रायल-हमास संघर्ष संपवण्याच्या दृष्टीनं कतार, इजिप्त आणि अमेरिकी मध्यस्थांशी चर्चा करण्यासाठी इस्रायलचं शिष्टमंडळ आज रोमला रवाना झालं. मोसादचे संचालक डेव्हिड बरनिया यांच्या नेतृत्वाखाली हे शिष्टमंडळ कतार, इजिप्त आणि अमेरिका मध्यस्थांशी चर्चा करेल. गाझा पट्टीमध्ये युद्धविराम, आणि १०० हून जास्त ओलिसांची सुटका करण्यासाठी ते प्रयत्न करतील.

<><><><><>

महिलांच्या आशिया चषक टी-ट्वेटी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताला पराभव पत्करावा लागला. श्रीलंकेनं विजेतेपद पटकावलं. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून १६५ धावा केल्या. स्मृती मंधानानं सर्वाधिक ६० धावा केल्या.

विजयासाठी १६६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेनं सामन्यातले ८ चेंडू बाकी असतानाच अवघ्या दोन गड्यांच्या मोबदल्यात १६७ धावा केल्या, आणि हा सामना ८ गडी राखून जिंकला. हर्षिता समरविक्रमानं नाबाद ६९, तर कर्णधार चमारी अटापट्टूनं ६१ धावा केल्या. कविशा दिलहारीनं नाबाद ३० धावांचं योगदान दिलं.

भारताची गोलंदाजी निष्प्रभ ठरली. दिप्ती शर्मानं ४ षटकं टाकताना ३० धावा देत एक बळी मिळवला. तिच्या व्यतिरिक्त भारताच्या इतर कोणत्याही गोलंदाजाला बळी मिळवता आला नाही.

<><><><><>

भारतीय पुरुष संघाच्या श्रीलंका दौऱ्यात, पल्लिकेले इथं आज होत असलेला दुसरा टी-ट्वेंटी सामना सुरु व्हायला पावसामुळे विलंब झाला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा श्रीलंकेच्या ११ षटकात २ बाद ८८ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताची नेमबाज मनू भाकर हिनं आज इतिहास घडवला. महिलांच्या १० मीटर एअर पिस्टल प्रकारात तिनं २२१ पूर्णांक ७ दशांश गुणांसह कांस्यपदकावर नाव कोरलं आणि या स्पर्धेतलं पहिलंवहिलं पदक भारताला मिळवून दिलं. १२ वर्षांनी भारताला नेमबाजीत पदक मिळालं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह इतर मान्यवरांनी या यशाबद्दल मनू भाकरचं अभिनंदन केलं आहे. तिनं मिळवलेलं हे यश अनेक क्रीडापटूंना, विशेषतः महिलांना प्रेरणा देईल, असे गौरवोद्गार राष्ट्रपतींनी काढले आहेत. तर, नेमबाजीत भारताला पदक मिळवून देणारी ती पहिली महिला ठरली असल्यानं हे यश आणखी खास असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज महिलांच्या १० मीटर एअर रायफलमध्ये भारताच्या रमिता जिंदालनं अंतिम फेरी गाठली. तिनं ६३१ पूर्णांक ५ दशांश गुणांची कमाई करून पाचवं स्थान मिळवलं. नौकानयनपटू बलराज पन्वर यानं उपांत्यपूर्व फेरीतलं स्थान नक्की केलं. यासाठीच्या पात्रता फेरीत त्यानं दुसरा क्रमांक

पटकावला. बॅडमिंटनमध्ये पी. व्ही. सिंधू हिनं सलामीच्या लढतीत आपल्या प्रतिस्पर्ध्यावर २१-९, २१-६ अशी सहज मात केली.

**<><><><><>**

२०२४ चा केंद्रीय अर्थसंकल्प सर्वसमावेशक आणि देशासाठी अमृत पिढी घडवणारा असल्याचं प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी केलं आहे. या अर्थसंकल्पाचा फायदा देशाच्या १४० कोटी जनतेला मिळणार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी मुंबईत एका कार्यक्रमात बोलताना केला. या अर्थसंकल्पात फक्त गरिबांचं नाही, तर शेतकरी, युवा आणि महिलांचंही हित साधलं जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.